# ४. अटक

गुन्ह्यातील आरोपीस भारतीय राज्य घटनेने नागरिक म्हणून त्याला दिलेले मूलभत अधिकार प्राप्त आहेत. त्यामुळे पोलीसांना खालीलप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

(१) आरोपीस अटक केल्यानंतर त्यास कोणत्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे, हे गुन्हा चे कलमासह माहीती देणे.

(२) पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांनी अटक करताना किंवा तपास करताना त्यांनी आपले ओळखपत्र दाखवावे व नांव, हुद्दा यांची पट्टिका गणवेषावर स्पष्ट दिसेल अशी लावणे.

(३) आरोपीने विनंती केल्यास त्याच्या अटकेबाबत माहिती त्यांच्या नातेवाईक किंवा घरातील लोकांना कळविणे व त्याची नोंद पोलीस स्टेशनच्या डायरीत घेणे.

(४) अटक करतेवेळी त्याच्या अंगावरील जुन्या व ताज्या जखमांची वैद्यकीय तपासणी करून त्याची नोंद घेणे.

(५) अटक आरोपी पोलीस कोठडीत असतानाही प्रत्येक ४८ तासाला त्याची वैद्यकीय तपासणी करणे.

(६) आरोपी पोलीस कोठडीत असताना त्याचे वकीलास त्याला भेटण्याची परवानगी देणे.

(७) आरोपीस अटक केलेबाबतची माहिती जिल्हा नियंत्रण कक्ष व राज्याचे पोलीस मुख्यालय येथे देणे.

**(८) आरोपीस अटक केल्यानंतर २४ तासांचे आत त्यास संबंधित न्यायदंडाधिकारी/न्यायाधीशांसमोर उभे करणे.**

## आरोपीस हातकडया लावण्याबाबत

गुन्ह्याचे स्वरूप, गुन्हेगाराचा पूर्वेतिहास, त्याची वागणूक व पलायन करण्याची शक्यता वाटल्यास हातकडी लावण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. प्रत्येक गुन्ह्याच्या प्रकरणात अटक केल्यानंतर हातकडी लावणे बंधनकारक नाही. महिला, बालगुन्हेगार, महारोगी यांना हातकडया लावता येत नाहीत.

❑❑

